क्रं:पोअग/पशा–२अ/वनजमिन प्रस्ताव नवेझरी/२०२०– ०२
कार्यालय पोलीस अधिक्षक, गडचिरोली
दिनांक : १७/०१/२०२०.

प्रति,

उपवनसंरक्षक,
वडसा वनविभाग,
वडसा.

**विषय :– मौजा – नवेझरी येथील पोलीस मदत केंद्र, नवेझरी करिता कायमस्वरूपी बांधकाम करण्याकरिता सर्व्हे क्रं.५८ मधिल २.०० हेक्टर आर वनजमीन मंजुर होणेबाबत.**

––०––

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संपुर्ण गडचिरोली जिल्हा हा नक्षल प्रभावित क्षेत्र असून नक्षलवादयांच्या हिसंक व बेकायदेशिर कारवायावर प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाने गंभीरतेने विचार करून जिल्हा पोलीस दल व राज्य राखीव पोलीस बल तसेच केंद्रीय राखीव पोलीस बल तैनात करण्यात आलेले आहे. पोलीस मदत केंद्र, नवेझरी येथे जिल्हा पोलीस व केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालीयन करिता कायमस्वरूपी प्रशासकीय इमारत, निवासी बॅरेक्स, मोर्चा, संरक्षण भिंत, कर्मचारी निवासस्थाने बांधकामाकरिता जागेची आवश्यकता आहे. तरी मौजा – नवेझरी येथे आपले विभागाची भुमापन क्रं ५८ आराजी ३२.५७ हेक्टर आर पैकी २.०० वनजमीन सुरक्षितेतेच्या दृष्टीकोनातुन अतिआवश्यक व सोईची आहे. गडचिरोली जिल्हातील वाढत्या कारवायावंर आळा घालण्याकरीता पोमके ला केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालीयन तैनातीस आहेत. सदर नक्षलग्रस्त भागात धोकादायक व बिकट परिस्थिती मध्ये कार्यरत पोलीस दलास आवश्यक मुलभुत सोयी सुविधा व सुरक्षितता पुरविण्यासाठी कायमस्वरूपी बांधकाम करणे अतिआवश्यक आहे.

तरी पोलीस मदत केंद्र नवेझरी करिता आपले विभागाकडील मौजा नवेझरी ता. कोरची, जि. गडचिरोली येथील सर्व्हे क्रमांक ५८ मधिल ३२.५७ हेक्टर आर पैकी २.०० हेक्टर वनजमीन मंजूर करावी.

<u>सहपत्र</u> – एकुण ५ प्रतीत

**( शैलेश बलकवडे,** भा.पो.से **)**
पोलीस अधिक्षक, गडचिरोली

**<u>प्रतसविनय सादर</u>**:–१) पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प नागपुर.
२) मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपुर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स) यांचे कार्यालय वनभवन, रामगीरी रोड, सिव्हील लाईन नागपुर.)

**प्रत सस्नेह अग्रेषित** :– १) जिल्हाधिकारी, गडचिरोली.
२) मुख्य वनसंरक्षक, वनवृत्त गडचिरोली.

21-1-2020 ५ फोईल

प्राप्त झाले
आवक लिपीक
वडसा वनविभाग वडसा

20.1.2020